# "फसगत"

घड्याळाच्या काट्याप्रमाणे दिवस / महीने / वर्ष भराभर संपून गेले. शरदरावांनी नोकरी-निमित्ताने मुंबईला-बोरिवली येथे बस्तान बसवले. लहान गावातून आल्यामुळे शहरी संस्कृतीची सवय लावून घ्यायला बराच अवधी लागला. आज आठवणींचे आभाळ भरून येण्याचे कारण म्हणजे ३५/४० वर्षे इथे सुखदुःखात घालवून आता निवृत्तीनंतरचे दिवस आरामात 'जव्हार' या आपल्या गावी घालवावे असा विचार त्यांच्या धर्मपत्नीची-शालिनीबाईंची इच्छा लक्षात घेवून त्यांनी पक्का ठरवला. आणि त्याचेच नियोजन दोघेमिळून करु लागले. बोलतांना एखादा प्रसंग आठवायचा मग त्याच्या मागची-पुढची सगळी संगती लागायची आणि दोघेही त्या प्रसंगात हरवून जायचे, त्याबद्दल भरभरुन बोलायचे.

शरदराव सुरवातीला मित्रासोबत - 'अनंता' सोबत एका खोलीत राहिले. एका मोठ्या कंपनीत अकाउंटंट म्हणून काम करायचे. त्यासाठी सकाळी ८ वाजता लोकलने निघून रात्री ८ पर्यंत घरी खोलीवर पोहचायचे. फक्त रविवारच काय तो फुरसतीचा मिळायचा. जीवन जणू यंत्रवतच झाले होते. एकदा अनंताचे काका मुलीसाठी - शालिनीसाठी स्थळ बघायला म्हणून आले. योगायोगाने त्यांना शरदरावच मुलीसाठी योग्य वाटले. मग काय भराभर चक्र फीरली आणि 'शालिनी - शरदचे' शुभमंगल झाले.

जवळचाच एक वन बीएचके फ्लॅट भाड्याने घेवून संसाराची सुरवात झाली. अधून-मधून गावाकडे जव्हारला जाणे व्हायचे. तिथे त्यांचे लहानपणीचे ३/४ मित्र अजूनही होते. त्यापैकी बाबुराव हा त्यांना

②

जवळच्या वाड्याचा. व्यवहार तसा खोडकर, छांदिष्ट होता; पण आता वडिलांच्या तांदुळाच्या गिरणीचं काम तो बघत होता. आल्यानंतर एकमेकांची भेट व्हायची. आधीचा आपलेपणा नसायचा, दुरावा भरलेला असायचा.

शालीनीलाही जव्हारचं निसर्ग सौंदर्य खुप आवडायचे. यथावकाश त्यांचा संसार बहरला. राजीव - संजीव या दोन मुलांचं बालपण, शाळा, कॉलेज शिक्षणात दोघेही गुरफटले. जव्हारला जाणे कमी होवू लागले.

राजीव एम कॉम होवून महाराष्ट्र बँकेत नोकरीला लागला. संजीवला प्रवासाची आवड असल्यामुळे त्याने टुरिझम मध्ये डिप्लोमा घेतला व ट्रॅव्हल कंपनीत नुकताच नोकरीला लागला होता. जागेची अडचण म्हणा किंवा मोठ्या घराचे स्वप्न पूर्ण होण्याची संधी अचानकच चालून आली. त्यांच्या वर असलेला थ्री बीएचके फ्लॅट विकायचा अशी कुणकुण कानावर आल्याबरोबर राजीवने पुढाकार घेवून तो फ्लॅट विकत घेतला. थोडेफार रीनॉव्हेशन करून सगळेजण नवीन घरात रहायला आले. सगळ्या आनंदी आनंद होता.

अशातच शरदराव रीटायर्ड झाले आणि जव्हारला रहाण्याचा निर्णय मुलांना सांगितला. आणि म्हणूनच त्यांना सगळ्या आठवणी येवू लागल्या. शेजारी, मित्रमंडळ त्यांना निरोप देण्यासाठी घरी बोलावू लागली. खरंच, केवढा लोकसंग्रह जमा केला आपण त्यांनाच आश्चर्य वाटले. सगळ्यांचा आनंदाने निरोप घेवून चौघेजण जव्हारला आले. दोन दिवस राजीव-संजीव राहयले. आजी आजोबांनाही खुप आनंद झालेला त्यांना दिसला. शेवटी आता आपल्याला दोघांनाच बोरीवलीला रहायचे, आई बाबांची आठवण येणार, कसं होणार आपलं ??

दोघेही बावरेबावरे व्हायचे. शालीनीताई त्यांना प्रेमाने समजवायच्या. स्वावलंबनाचे धडे तर त्यांनी दिलेच होते. आता म्हणायच्या की, या परीक्षेत पास होवून दाखवा. बाबा जसे एकटे आले होते आणि स्वतःच्या मेहनतीने जीवन फुलवलं ते तुम्हाला माहीतच आहे. विशेष म्हणजे तुम्हाला आर्थिक अडचण पण नाही आहे. छान रहा. लवकरच तुमच्याही जीवन नवीन सुखस्वप्नांनी बहरून जाईल. लवकरच तुम्हाला लग्नाच्या बेडीत पण अडकायचं आहे नं? अशी थोडी थट्टामस्करी पण केली. शेवटी जड अंतःकरणाने ते दोघे बोरीवलीस गेले.

इकडे शरदरावांची नवीन दिनचर्या सुरु झाली. शालीनीबाईंनाही दुमजर घरात रहायला आवडले. इथे येणारे-जाणारे-पै पाहुणे सतत असायचे. दिवसभर घरकामाला असणाऱ्या 'रंधाबा' सगळं आपलेपणाने करायच्या. बाबांनी थोड्या नवीन सुखसोयीही करून घेतलेल्या होत्या.

एक दिवस कोण कोण मित्र भेटतात? ते बघुया म्हणून सकाळीच शरदराव बाहेर पडले. खुणेच्या जागा काळाच्या ओघात जमिनदोस्त झाल्या होत्या. नवीन घरे, हॉटेल्स, सदनिकांनी इथेपण वर्णी लावलीच होती. इकडेतिकडे बघत असतांना त्यांना, 'साहेब, चहा प्यायला १० रु. द्या न' असं कोणीतरी म्हणत आहे असं जाणवलं. बघतात तर खरंच, केस पिंजारलेला, दाढी वाढलेली, कपड्याची लक्तरं लोंबकळत असणारी व्यक्ती त्यांच्याशी बोलत होती. त्याची ती दैनवाणी अवस्था शरदरावांना बघवली नाही. त्यांनी २० रु. ची नोट त्याच्या हातात ठेवली. काहीतरी बोलायचे म्हणून नाव विचारले. त्याने 'बाबुराव' नांव सांगताच शरदरावांना धक्काच बसला. 'अरे बाबुराव, तू आणि अशा या अवस्थेत?? कसं

शक्य आहे ?? अन् तुझी अशी दशा कशीकाय झाली ?? काका-काकू, तुमची नांदुकाची गिरणी, घर सगळं कसं छान चाललं होतं नं ?? या देवळाच्या पायरीवर चल, बसून बोलू. सांग बर मला सगळं !!

बाबुरावाला रडू आवरेना. थरथरत तो म्हणाला, अरे शन्या, काय सांगु माझी रडकथा - माझ्याच हाताने मी सर्वनाश केला रे. तुला तर माहीतच आहे, लहानपणापासून मला नकला करण्याची, नाटकात काम करण्याची आवड होती. बाबा मला गिरणीकडे लक्ष दे लक्ष दे असं कळवळून सांगायचे; पण माझा जीव तिथे रमला नाही. हनुमान पॉइंटजवळच्या राजवाड्यात नेहमी सिनेमाचे, हिंदी सिरीयल्सचे शुटींग चालायचे ते बघायला मी तासनतास जाऊ लागलो. तिथल्या वाईट लोकांच्या मी नादी लागलो. माझी खुप स्तुती करायचे, आता सांगतांना लाज वाटते पण मी पूर्णतः दारूच्या आहारी गेलो. ते म्हणतील तेव्हा त्यांना पैसा पुरवू लागलो. एक-दोनदा एका सिनियरच्या छोट्या भूमिकेत मला काम दिलं. तुझं हे काम मुंबईला मोठ्या साहेबांना दाखवतो मग ते तुला नायक बनवतील. त्यासाठी लाखोंनी पैसा लागेल. वेड्यासारखा मी त्यांना पैसा देत गेलो. ते नंतर स्टुडीओत मुंबईला निघून गेले. मला बोलावणं कधी येईना सगळी रोकड, गिरणी पण गहाण टाकली होती. शेवटी हिंमत करून स्टुडीओत गेलो आणि तिथला झगमगाट पाहून माझे डोळेच दिपले. त्यांच्या विश्वात मी पार अडाण्याचे. आपली फसगत झाल्याचे लक्षात आले.

घरी परत आल्यावर आईबाबांना सगळं कळलं. ते हा धक्का सहन करू शकले नाही आणि माझं मातापित्याचं छत्र नाहीसं झालं. गावात कोणी माझ्याशी बोलत नाही, कोणी काम देत नाही

एकदा विश्वास गमावला की सर्वस्वाचा नाश होतो, आज तू ~~ओळ~~ ओळखलास, चौकशी केली बरं वाटलं; आता मी जातो, असं म्हणत म्हणत तो उठला आणि धावत पळत देवळाच्या मागील झाडीत गेला सुद्धा !!

शरदराव अवाक झाले, त्यांना सुचेच ना काय करावं ते ?? घरी आल्यावर त्यांनी बाबांना बाबुरावची हकीकत सांगितली. बाबा म्हणाले, 'सुरवातीला आम्हाला सगळ्यांना त्याच्याबद्दल वाईट वाटायचे, आजुबाजूच्या घरी वार लावून त्याच्या जेवणाचीही सोय केली होती, पण तो एका ठिकाणी टिकतच नव्हता, मध्येच गायब व्हायचा. दिसला कधी तर थोड्याफार पैशाची मदत करतो. याशिवाय आणखि कांही करु शकत नाही. वाईट लोकांच्या नादाला लागून अशी अक्षरशः दशा झाली; तुला मुद्दाम कळवून सांगितलं नाही, समजेल तेव्हा कळेलच असं वाटलं. त्याच्याबद्दल आणखि काही विचारायचं असेल तर दिघेंच्या महेशला विचार; तो तुझा पण मित्र आहे नं !

शरदरावांना खूपच वाईट वाटलं. किती झालं तरी लहानपणापासूनचा मित्र होता बाबुराव त्याची अशी परवड व्हायला नको होती असं मनाशी म्हणत ते महेशला भेटायला गेले ----



हव्यास आणि वाईट संगत  
जीवन करी विसंगत  
होता पैशी फसगत  
दुःखाचीच सदैव सोबत ...

शब्दांकन: सौ विजया जोशी - श्री विष्णू रामचंद्र उपाध्ये